**श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले, जि. प. अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी व सादरकर्ता अधिका-याची नेमणुक करणे.**

**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
जिल्हा परिषद परिपत्रक क्र.साप्रवि-१/आस्था-४/ ६३ /२०२५
अहिल्यानगर दिनांक - ११ फेब्रुवारी २०२५

**वाचा -** १. कार्यालयीन दोषारोपपत्र आदेश क्रं साप्रवि-१/आस्था-४/३७/२०२५ दि. २२/०१/२०२५
२. वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेकडील पत्र क्र. २१/२०२५ दि. २३/०१/२०२५
३. श्री. धुमाळ यांचेकडील दि.३१/०१/२०२५ रोजीचा लेखी खुलासा
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.३ नुसार
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६.५ नुसार

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले, जि. प. अहिल्यानगर सेवा निलंबन होऊन परिचर(गट ड) या पदावर प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले येथे दिनांक १०/०४/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत हजर झालेले आहेत. परंतु ते **दिनांक २१/०५/२०२३ ते ३१/०८/२०२३ रोजी पर्यंत एकूण १३५ दिवस व २७/१०/२०२३ ते आज अखेर अनधिकृत गैरहजर** असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद, सेवा (शिस्त व अपील) नियम १९६८ चे नियम ३ चा भंग केला आहे.

उक्त संदर्भ क्रं.१ अन्वये श्री धुमाळ, परिचर यांचेविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्यात आले असुन संदर्भ क्रं.३ अन्वये श्री. धुमाळ यांचेकडील दि. ३१/०१/२०२५ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असुन त्यांचेवर ठेवण्यात आलेले दोन्ही आरोप त्यांनी अमान्य केलेले आहेत.

यास्तव श्री. धुमाळ यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर उक्त नियमाच्या तरतुदीनुसार श्री. धुमाळ, परिचर यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाच्या संदर्भात चौकशी करण्याचे आदेश देत आहे. सदरची चौकशी करणेकामी संदर्भ क्रं.४ चे तरतुदीनुसार विशेष चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. सदर विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच संदर्भ क्रं.५ चे तरतुदीनुसार प्रस्तुत विभागीय चौकशीकामी अहिल्यानगर जिल्हा परिषदेची बाजु मांडणे करिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. शिवराम धोंडू डगळे, कार्यालयीन अधिक्षक, पंचायत समिती अकोले यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.१ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्रं. ३ व ४ मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय संकेतांक क्रं. २०२५०२११०४००१८ असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 18-02-2025 14:13:09
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा,
सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि प कर्मचारी)
आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.

२/- सोबत श्री. धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचे गैरवर्तनाबाबतचे पत्रव्यवहार संचीका पृष्ठ क्रं.१ ते यासमवेत जोडले असुन विभागीय चौकशी करुन अहवाल सादर करावा.

२. श्री.शिवराम धोंडू डगळे, कार्यालयीन अधिक्षक, पंचायत समिती अकोले
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले.

२/-सदर आदेश श्री. डगळे,कार्यालयीन अधिक्षक व श्री. धुमाळ, परिचर यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच सादर करावी.

प्रत :- १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
२. वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग १
जा.क्र.साप्रवि१/आस्था-४ /२४६ / ३७ /२०२५
अहिल्यानगर दिनांक २२/०१/२०२५

ज्ञापन /दोषारोप पत्र

मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ६ अन्वये **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांचे विरुध्द शिस्त भंगाची कार्यवाही करण्याचे ठरविले आहे. अशा गैरशिस्तीच्या अथवा गैरवर्तणुकीच्या दोषारोपाचा गोषवारा सोबत जोडलेल्या दोषारोपांच्या बाबींच्या विवरणात (जोडपत्र-१) दिलेले आहे. प्रत्येक आरोपाच्या पृष्ठयर्थ गैरशिस्तीच्या किंवा गैरवर्तणुकीच्या आरोपांचे विवरण सोबत जोडले आहे.

२/- **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांना असा निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी हे ज्ञापन मिळाले पासुन १० दिवसांचे आत त्यांचे बचावाचे लेखी निवेदन सादर करावे तसेच त्यांचे म्हणणे व्यक्तीश: मांडण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांनी तसे नमुद करावे.

३/- **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** त्यांना असेही कळविण्यात येते की, जे दोषारोप त्यांनी कबुल केलेले नाहीत. तेवढया दोषारोपांचे बाबतीतच चौकशी केली जाईल. म्हणुन त्यांनी प्रत्येक दोषारोप विनिर्देश पुर्वक कबूल किंवा नाकबूल केला पाहिजे.

४/- **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांना आणखी असेही कळविण्यात येते की, त्यांनी वरील परिच्छेद २ मध्ये विनिर्दीष्ठ केलेल्या दिनांकाला किंवा त्यापुर्वी आपले बचावाचे लेखी निवेदन सादर केले नाही किंवा चौकशी प्राधिका-यापुढे ते व्यक्तीश: हजर झाले नाहीत किंवा त्यानी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे नियम ६ मधील तरतुदीचे किंवा उक्त नियमानुसार काढण्यात आलेले आदेशाचे/निर्देशाचे अनुपालन करण्यात त्यांनी कसुर केली वा नकार दिला तर चौकशी प्राधिका-यास त्यांचेविरुध्द एकतर्फी चौकशी चालू करता येईल.

५/- **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांचे महाराष्ट्र नागरी सेवा नियम (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ६ (२) व (५) कडे लक्ष वेधण्यात येत आहे. नियमानुसार कोणत्याही जिल्हा परिषद शासकीय कर्मचा-याला त्यांच्या शासकीय सेवे संबंधिच्या कोणत्याही बाबतीत त्यांच्या हितसंबंधात पोषक होईल अशा प्रकारे वरिष्ठ प्राधिकाऱ्यावर राजकीय अथवा बाहय दबाव आणता येणार नाही किंवा आणण्याचा प्रयत्न करता येणार नाही. या बाबतीत त्यांचे वतीने अन्य व्यक्तीकडुन या शिस्तभंग विषयक कार्यवाही संबंधात अभिवेदन असल्यास **श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांना असे अभिवेदन केले असल्याची माहिती होती व ते त्यांच्या सांगण्यावरुन करण्यात आले आहे असे गृहीत धरण्यात येईल व महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ६ (२) व ५ चे उल्लंघन केले बद्दल त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

सदर ज्ञापन मिळाल्याची पोहोच द्यावी.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 13:53:33
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले
द्वारा व प्रत- वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/- सदरचे दोषारोप पत्र सबंधितास बजावुन दुस-या प्रतीवर संबधिताची प्रत मिळाले बाबतची तारखेसह स्वाक्षरी घ्यावी व ती प्रत त्वरीत इकडेस सादर करावी.

जोडपत्र १

(दोषारोपांच्या बाबी)

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ नुसार ठेवावयाचे दोषारोपांचे विवरण पत्र.

..........................................................................................................................

आरोप क्र. १ :- कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर असल्याने आदिवासी क्षेत्रातील नागरिकांना अत्यावश्यक सेवा देण्यास अडचण निर्माण होत आहेत.

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले हे कार्यालयाची कोणत्याही प्रकारची पुर्व परवानगी न घेता वारंवार कार्यालयीन कामी गैरहजर राहुन त्यांनी कार्यालयीन कामकाजात अडचण निर्माण केली आहे. तसेच वारंवार गैरहजर असल्यामुळे आदिवासी क्षेत्रातील नागरिकांना अत्यावश्यक सेवा देण्यास अडचण निर्माण होत आहेत. सबब नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ उल्लंघन केले आहे.

आरोप क्र. २ :- वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांचे पालन न करणे.

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांना अनधिकृत गैरहजर असलेल्या कालावधीत पत्रव्यवहार केला असता पोस्टाने रजेचा अर्ज कार्यालयाला पाठवत आहेत व कर्तव्यावर हजारही होत नाहीत. सबब श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ उल्लंघन केले आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 13:53:10
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

## जोडपत्र - २
## (दोषारोपांचे विवरण)

**श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ नुसार तयार करण्यात आलेल्या दोषारोपातील बाबींच्या पुष्टयर्थ असलेल्या गैरशिस्तीच्या किंवा गैरवर्तणुकीच्या आरोपाचे विवरणपत्र**

.......................................................................................................................

**आरोप क्र. १ :- कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर असल्याने आदिवासी क्षेत्रातील नागरिकांना अत्यावश्यक सेवा देण्यास अडचण निर्माण होत आहेत.**

श्री. **नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांचे सेवा निलंबन होऊन परिचर(गट ड) या पदावर प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले येथे दिनांक १०/०४/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत हजर झालेले आहेत. श्री. धुमाळ यांचेवर कार्यालयाने सोपविलेले कामकाजाची जबाबदारी न पार पडता वारवांर कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर आहेत. प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले येथे एकूण ३ परिचर पद मंजुर असून त्यापैकी २ पद भरलेले आहेत. एक महिला परिचर व एक पुरुष परिचर श्री. धुमाळ हे सतत गैरहजर असल्याने रात्रीच्या वेळी येणाऱ्या रुग्णांना सेवा देणेसाठी परिचर नाही. तसेच प्रा. आ. केंद्र येथील मालमत्तेची सुरक्षितता तसेच परिसरातील साफसफाई वेळोवेळी ठेवणे आवश्यक असताना श्री. धुमाळ गैरहजर असल्याने अडचणीना तोंड द्यावे लागत आहे. कार्यालय सोडताना पुर्व परवानगी अथवा रजेवर जाताना वरिष्ठाकडुन रजा मंजूर करून घेणे हे बंधणकारक असतानाही वरिष्ठाकडुन रजा मंजूर करून न घेता स्वतःच्या अधिकारात गैरहजर आहेत. दिनांक ०९/१२/२०२३ रोजी तालुका आरोग्य अधिकारी यांची प्रा. आ. केंद्र येथे थेट भेट दिली असता त्यांनी केलेल्या चौकशी दरम्यान श्री. धुमाळ अनाधिकृत गैरहजर दिसून आले.

श्री. धुमाळ, परिचर यांना कार्यालयाने वेळोवेळी संधी दिलेली आहे. परंतु, त्यांच्या वर्तनात कोणत्याही प्रकारे बदल न होता कार्यालयीन कामकाजात उदासिनता दिसुन येत आहे. श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले कार्यालयाकडे हजर झालेपासुन खालीलप्रमाणे कार्यालयीन कामी अर्ज न देता गैरहजर राहीले आहेत.

| अ.नं. | महिना | गैरहजर कालावधीचा दिनांक | गैरहजर दिवस |
|---|---|---|---|
| १ | माहे मे २०२३ ते माहे ऑगस्ट २०२३ | २१/०५/२०२३ ते ३१/०८/२०२३ | १३५ |
| २ | माहे आक्टोंबर २०२३ ते आज अखेर | २७/१०/२०२३ ते आज अखेर (दिनांक ०३/०१/२०२५) अखेर | ४३४ |
| | | **एकुण** | **५६९** |

वरीलप्रमाणे एकुण ५६९ दिवस वेळोवेळी कार्यालयीन कामी गैरहजर राहिले आहेत. श्री. धुमाळ, परिचर हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी असल्याने सदैव तत्पर व कर्तव्यदक्ष असणे आवश्यक असताना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करुन गैरवर्तन केलेले आहे.

सबब श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ चे उल्लंघन केले आहे.

आरोप क्र. २:- वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांचे पालन न करणे.

श्री. **नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले** यांचे सेवा निलंबन होऊन परिचर(गट ड) या पदावर प्रा.आ. केंद्र कोहणे, ता. अकोले येथे दिनांक १०/०४/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेत हजर झालेले आहेत. श्री. धुमाळ यांचेवर कार्यालयाने सोपविलेले कामकाजाची जबाबदारी न पार पडता वारवांर कार्यालयीन कामी अनाधिकृतपणे गैरहजर राहुन नंतर रजेचे अर्ज पोस्टाने कार्यालयात सादर करत आहेत. परंतु कर्तव्यावर हजर होत नाहीत. श्री. धुमाळ यांना विनापरवानगी गैरहजर राहु नका अशा लेखी व तोंडी सुचना वेळोवेळी दिल्यानंतर देखील अनाधिकृतपणे गैरहजर आहेत. परंतु सदर कर्मचाऱ्यांच्या वर्तनात कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. त्यामुळे श्री. धुमाळ यांनी कार्यालयीन कामकाजात हालगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करुन वरिष्ठांच्या आदेशांचा अवमान केलेला आहे.

सबब श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील ३ उल्लंघन केले आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 13:51:36

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

<u>जोडपत्र-३</u>

<u>(साक्षीदारांची यादी )</u>

श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ नुसार तयार केलेल्या आरोपाच्या पुष्टयर्थ गैरशिस्तीच्या किंवा गैरवर्तणुकीच्या आरोपाबाबत साक्षीदांराची यादी

...........................................................................................................................

१. डॉ. श्री. गोविंद काशीनाथ लोहकरे, वैद्यकीय अधिकारी.
२. श्री. कोते श्यामकुमार सखाराम, आरोग्य सहाय्यक.
३. श्रीम. देशमुख अनिता देवजी, आरोग्य सेविका
४. श्री. किसन सखाराम मेमाणे, कनिष्ठ सहाय्यक

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 13:52:22

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

## जोडपत्र -४
## (दस्तऐवजाची यादी)

**श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर, प्रा. आ. केंद्र कोहणे, ता. अकोले यांचेविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ अन्वये तयार केलेल्या आरोपाच्या पृष्ठ्यर्थ असणाऱ्या गैरशिस्तीचे आरोपाबाबत पुराव्याचे दस्ताऐवजाची यादी**

........................................................................................................................................

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अहिल्यानगर याकडील आदेश क्र. साप्रवि-१/आस्था-४/०४-२१/२१५/२०२३ दिनांक २९/०३/२०२३
२. श्री. नितीन शहाजी धुमाळ, परिचर यांचा प्रा.आ.केंद्र कोहणे ता. अकोले येथे हजर दिनांक १०/०४/२०२३
३. वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कोहणे ता अकोले यांचेकडील पत्र जा. क्र. आरोग्य/आस्था/२१३/२३ दिनांक ०७/०६/२०२३
४. वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कोहणे ता अकोले पत्र जा. क्र. आरोग्य/आस्था/२६४/२०२३ दिनांक २०/०७/२०२३
५. वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कोहणे ता अकोले पत्र जा. क्र. आरोग्य/आस्था/५२६/२०२३ दिनांक ०८/११/२०२३
६. मा. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती अकोले यांची दिनांक ०९/१२/२०२३ रोजी भेट व शेरेबुकात केलेली नोंद
७. वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कोहणे ता अकोले येथील माहे एप्रिल २०२३ ते डिसेंबर २०२४ पर्यंतचे हजेरी मस्टर
८. वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र कोहणे ता अकोले पत्र जा. क्र. आरोग्य/आस्था/०३/२०२५ दिनांक ०३/०१/२०२५

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 13:51:08

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर